राज्य आधारसामग्री प्राधिकरण कार्यान्वयित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र. : डब्ल्युबीके २०२५/ प्र.क्र. ११६/का.१४१७**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक: १० नोव्हेंबर, २०२५

**वाचा :** १. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : नीतिआ-२०२२/प्र.क्र.३७ (भाग-१)/ का-१४१२, दि. ११ नोव्हेंबर, २०२२

२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक :डब्ल्यूबीके-२०२४/प्र.क्र.१३/का-१४१७, दि. १४ मार्च, २०२४

३. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१०९/का-१४१७, दि. १७ एप्रिल, २०२५

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासन आधारसामग्री आधारित सुशासनासाठी कटीबध्द असून शासनाने खाजगी क्षेत्र व अशासकीय संस्थांच्या सहभागाद्वारे राज्याचा जलद व सर्वसमावेशक विकास साधण्याच्या हेतूने महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र या संस्थेची स्थापना संदर्भाधीन क्र.१ दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे केली आहे.

२. जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासास चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता सक्षमीकरण प्रकल्प (Maharashtra Strengthening Institutional Capabilities in Districts for Enabling Growth Project - MahaSTRIDE) राबविण्यास संदर्भाधीन क्र. २ दिनांक १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. या प्रकल्पांतर्गत संस्थात्मक क्षमता बांधणीसाठी संसाधने जसे की, आधारसामग्री सुशासन, ॲनेलिटीक्स व क्षमता बांधणी यासाठी मित्र या संस्थेअंतर्गत राज्य आधारसामग्री प्राधिकरणाचे कार्यान्वयनासाठी संसाधने पुरविली जाणार आहेत.

३. वाचा क्र. ३ येथील दिनांक १७ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयान्वये “महाराष्ट्र राज्य आधारसामग्री धोरण २०२४” निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणामध्ये आधारसामग्री सुरक्षा, आधारसमग्रीचे आदान-प्रदान, ओपन डेटा तसेच जिओस्पॅशियल इंटीग्रेशन व ॲडव्हान्स ॲनॅलेटीक्स याकरीता सक्षम संरचना अंगिकारण्याचे अंर्तभूत आहे. या धोरणामध्ये राज्य आधारसामग्री प्राधिकरण हे अशा प्रकारच्या संचरना तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व त्यांच्या संनियंत्रणासाठी प्रमुख संस्था म्हणून कार्य करील, असे नमूद केले आहे.

४. ‘राज्य आधारसामग्री प्राधिकरण’ हे मित्र या संस्थेअंतर्गत स्थापन करण्यास संदर्भ क्र. ३ शासन निर्णय दिनांक १७ एप्रिल, २०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर प्राधिकरणाची कार्ये, त्या अंतर्गत पदभरतीची निवड पद्धती तसेच सदर प्राधिकरणाची नियमावली प्रस्तूत शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात महाराष्ट्र राज्य आधारसामग्री धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तसेच एकात्मिक आधारसामग्री परिसंस्था, आधारसामग्री आधारीत सुशासन, आधारसामग्रीचे द्विरूक्तीकरण टाळणे, आधारसामग्रीची सुरक्षा तसेच आधारसामग्रीचे सामायिकरण, इत्यादीसाठी महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन -मित्र या संस्थेअंतर्गत राज्य आधारसामग्री प्राधिकरण स्थापन करण्यास येत असुन त्याचे कार्यान्वयनास मंजूरी देण्यात येत आहे.

२. **राज्य आधारसामग्री प्राधिकरणाची निर्मिती व कार्यान्वयन**

**२.१ प्राधिकरणाची स्थापना**

राज्य आधारसामग्री प्राधिकरण हे मित्र या संस्थेचा एक भाग म्हणून कार्यान्वित करण्यात येत आहे. राज्य आधारसामग्री प्राधिकरण हे मित्र या संस्थेच्या प्रशासकीय संरचनेत कार्य करील.

**२.२** राज्य आधारसामग्री प्राधिकरणाचे प्रमुख हे मुख्य आधारसामग्री अधिकारी राहतील व ते प्राधिकरणाच्या सर्व कार्यकारी, वित्तीय व प्रशासकीय बाबी मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र यांना सादर करतील. तसेच राज्य आधारसामग्री प्राधिकरणाचे धोरणात्मक दिशानिर्देश शासनाच्या आणि महाराष्ट्र राज्य आधारसामग्री धोरण २०२४ मधील सूचनेच्या अनुषंगाने असतील.

## २.३ राज्य आधारसामग्री प्राधिकरणाचे अधिकार आणि कार्ये : -

राज्य आधारसामग्री प्राधिकरणाची प्रमुख कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

### अ. आधारसामग्री सुशासन आणि धोरण

- आधारसामग्री संकलन, वर्गीकरण, सामायिकरण, गोपनीयता, सुरक्षा, मूल्यवृध्दी आणि आधारसामग्री आधारित धोरण निश्चितीसाठी लागणारी तपशिलवार मार्गदर्शक तत्त्वे, नियम आणि मानक कार्यप्रणाली (SOPs) तयार करणे व त्यांची शिफारस करणे.

- सर्व विभागांनी एकसंध आधारसामग्री मानके पाळणे आणि राज्य आधारसामग्री धोरणाचे अनुपालन करणे यासाठी सर्वोच्च प्राधिकरण म्हणून कार्य करणे.

- राज्य आधारसामग्री आराखडा (State Data Framework) तयार करणे आणि सर्व उपलब्ध आधारसामग्री (भौगोलिक माहिती डेटासह) वापरून राज्य डॅशबोर्ड कार्यान्वित करणे.

- केंद्र आणि राज्य शासनाच्या कायद्याच्या चौकटीत राहून, राज्य शासनाच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी सार्वजनिक आधारसामग्रीचे मूल्यनिर्धारण (Monetize) करणे.

### ब. आधारसामग्री वर्गीकरण, डॅशबोर्ड आणि सूचीकरण

- राज्य आधारसामग्री कॅटलॉग (State Data Catalogue) तयार करणे, संनियंत्रण करणे तसेच कोणकोणते आधारसामग्री संच - खुले, मर्यादित, संवेदनशील किंवा सामायिक करण्यायोग्य आहेत हे निश्चित करणे, तसेच गोपनीयता आणि संरक्षण मानकांचे अनुपालन सुनिश्चित करणे.

- समय श्रुंखला आधारसामग्री, अतिसूक्ष्म आधारसामग्री (मायक्रो), भौगोलिक आधारसामग्री आणि इतर संरचित/असंरचित आधारसामग्री संचासाठी आधारसामग्री धोरणाच्या अनुषंगाने एकच अधिकृत स्त्रोत निर्माण व्हावा यासाठी एकसंध आधारसामग्री साठा राखणे किंवा समन्वय साधणे.

### क. प्रगत ॲनॅलिटीक्स आणि भौगोलिक माहिती प्रणाली

- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र आणि माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांच्या समन्वयाने एआय / एमएल सोल्यूशन्स, आधारसामग्री विश्लेषण डॅशबोर्ड आणि भौगोलिक माहिती प्रणाली प्लॅटफॉर्म विकसित करणे व सनियंत्रण करणे.

- प्रगत विश्लेषण विभागीय कार्यप्रवाहात समाकलित करण्यासाठी फ्रेमवर्क जारी करणे आणि संबंधित शासकीय विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांना निर्णय घेण्यास सहाय्यभूत साधने पुरविणे.

**ड. आधारसामग्री गोपनीयता आणि सुरक्षा**

- राष्ट्रीय कायदे व राज्य आधारसामग्री धोरणाशी सुसंगत आधारसामग्री संरक्षण प्रोटोकॉल (सायबर सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे, एनक्रिप्शन मानके, इत्यादी) तयार करणे व त्याचे प्रमाणीकरण करणे.

- राज्य आधारसामग्री धोरणात शिफारस केल्यानुसार गोपनीय किंवा संवेदनशील आधारसामग्री जबाबदारीने हाताळण्यासाठी व्यक्तिगत माहिती गुप्त राखण्यासाठी सक्षम प्रणालीची अंमलबजावणी करणे.

- आधारसामग्री सार्वजनिक हितासाठी उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करणे तसेच पारदर्शकता आणि गोपनीयता यांच्यात समतोल राखणे.

- माहितीचा अधिकार आणि राष्ट्रीय आधारसामग्री सामायिकरण व सुलभता धोरण (NDSAP) च्या अनुषंगाने सामायिक करण्यायोग्य आधारसामग्री यादी (नकारात्मक/सकारात्मक सूची) जारी करणे.

**इ. मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे आणि अंमलबजावणी**

- शासकीय यंत्रणा, मंडळे, महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागणाऱ्या आधारसामग्रीचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमास अनुसरून योग्य त्या परवानग्यांसह मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे.

- आधारसामग्रीच्या मूल्यवर्धित सेवांच्या शुल्क निश्चितीसाठी राज्य आधारसामग्री प्राधिकरणाद्वारे मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे व राज्य आधारसामग्री प्राधिकरणाच्या नियामक समितीच्या मंजुरीने जारी करणे.

- विविध विभागांकडून प्राप्त होणाऱ्या अनुपालन अहवालांचे संनियंत्रण करणे, थेट किंवा तृतीय-पक्ष तज्ञामार्फत परीक्षण करणे तसेच सुधारणा उपाय सुचविणे.

**फ. क्षमता निर्माण आणि सहाय्य**

- शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी आधारसामग्री साक्षरता आणि विश्लेषण क्षमता वृध्दीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा / ज्ञान सत्रांचे आयोजन करणे.
- मित्र कार्यालयातील क्षेत्रीय तज्ञांच्या सहकार्याने शेती, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, इत्यादी क्षेत्रांमध्ये आधारसामग्री-आधारित अहवाल तयार करणे.

**ग. महास्ट्राईड प्रकल्पाअंतर्गत समन्वय**

- महास्ट्राईड प्रकल्पाच्या अंतर्गत राज्य आधारसामग्री धोरणासाठी आयटी प्रणालींची व हार्डवेअरची खरेदी, सल्लागार सेवा व क्षमता विकास उपक्रम यासारख्या आधारसामग्री-संबंधित उपघटकांचे नेतृत्व व समन्वय करणे.
- महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत आधारसामग्री प्राधिकरणाच्या कामकाजाचा अहवाल आणि खर्चाबाबतचा नियतकालिक प्रगती अहवाल महास्ट्राईड प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षास सादर करणे.
- महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत अर्थसंकल्प तयार करणे व आधारसामग्रीचे विश्लेषणात्मक सॉफ्टवेअर साधने विकसीत करण्यासाठी माहितीवर आधारीत धोरण तयार करणे.

**३. राज्य आधारसामग्री सुकाणू समितीच्या निर्देशानुसार राज्य आधारसामग्री प्राधिकरण, राज्य आधारसामग्री धोरणाचा भाग म्हणून मार्गदर्शक तत्वे आणि मानके तयार करेल, अंमलबजावणी सुलभ करेल आणि अंमलबजावणी करेल. सदर अंमलबजावणीमध्ये राज्य आधारसामग्री प्राधिकरणाची भूमिका आणि जबाबदारी पुढीलप्रमाणे राहील.**

**३.१ राज्य आधारसामग्री धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये राज्य आधारसामग्री प्राधिकरणाची भूमिका व जबाबदारी**

- आधारसामग्री जीवन चक्राच्या प्रत्येक टप्प्याकरीता धोरणात्मक मार्गदर्शक तत्त्वे आणि प्रक्रिया तयार करणे.
- आधारसामग्री धोरणाच्या अनुपालनाचे संनियंत्रण करणे व आधारसामग्री सुशासनाच्या गरजांनुसार सुधारणा प्रस्तावित करणे.

- विविध विभागांमध्ये एकसंघ आधारसामग्रीचे देवाणघेवाण बंधनकारक करणे, तसेच आधारसामग्रीची द्विरूक्ती टाळणे आणि आधारसामग्रीत सुसंगतता सुनिश्चित करणे.
- गोपनीयता, सुरक्षा आणि आंतरसंवाद यासाठी सक्षम आधारसामग्री सुशासन संरचना स्थापित करणे.
- नाविन्यता व सार्वजनिक हितासाठी संबंधित अडचणींवर मात करण्यासाठी खुल्या आधारसामग्रीस प्रोत्साहित करणे.

**३.२ स्वीकृती आणि अद्ययावतीकरण**

- विभागांनी राज्य आधारसामग्री प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा स्वीकार करून त्यांना आपल्या विभागीय प्रक्रियांमध्ये समाविष्ट करावे.
- राज्य आधारसामग्री धोरणातील कोणतेही अद्ययावतीकरण किंवा बदल यास विहित पद्धतीने अधिसूचित करणे आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी सहाय्य करणे.

४. राज्य आधारसामग्री प्राधिकरणास धोरणात्मक दिशा देण्यासाठी व राज्य आधारसामग्री धोरणाचे अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी नियामक समिती असेल ज्याची रचना व कार्ये वाचा क्र. ३ येथील दिनांक १७ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहेत. तसेच राज्य आधारसामग्री प्राधिकरणाच्या दैनंदिन कामकाजचे सनियंत्रण राज्य सुकाणू समिती करील ज्याची रचना व कार्ये वाचा क्र. ३ येथील दिनांक १७ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहेत.

**४ अ** - "महाराष्ट्र राज्य आधारसामग्री धोरण २०२४" ची अंमलबजावणी करीत असताना केंद्र शासनाच्या डिजिटल वैयक्तिक आधारसामग्री संरक्षण (DPDP) अधिनियमातील तरतुदींचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी राज्य आधारसामग्री प्राधिकरणाची राहील.

**५. राज्य आधारसामग्री प्राधिकरणा अंतर्गत पदांची रचना** व मुख्य आधारसामग्री अधिकारी (CDO), राज्य आधारसामाग्री प्राधिकरण आणि राज्य आधारसामाग्री प्राधिकरणांतर्गत सहाय्यक अधिकारी/ कर्मचारी यांची नेमणूक

## ५.१ मुख्य आधारसामग्री अधिकारी पदासाठी निवड समिती

महाराष्ट्र राज्य आधारसामाग्री प्राधिकरणाचे प्रमुख 'मुख्य आधारसामग्री अधिकारी' या पदाच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे निवड समिती राहील.

| अ. क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (नियोजन विभाग) | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (मा. व तं.) | सदस्य |
| ५ | सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र | सदस्य सचिव |

सदर मुख्य आधारसामग्री अधिकारी व इतर पदांच्या निवडीस राज्य आधारसामग्री प्राधिकरणाच्या नियामक समितीसमोर सादर करण्यात येईल. ही नियुक्ती ३ वर्षासाठी राहील (वार्षिक मूल्यांकनास अधीन राहून). मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र हे मुख्य आधारसामग्री अधिकारी या पदाचे प्रशासकीय व नियंत्रक अधिकारी असतील. तसेच इतर पदांच्या नेमणुकीसाठी मित्र कार्यालय स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र यांच्याद्वारे समिती गठीत करण्यात येईल.

## ५.२ सहाय्यक कर्मचारी

**सहाय्यक कर्मचारी :** मुख्य आधारसामग्री अधिकारी यांच्या आवश्यकतेनुसार **राज्य** आधारसामाग्री प्राधिकरणाच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक पदनिर्मितीस वित्त विभागाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त सहाय्यक कर्मचारी (उदा. माहिती व तंत्रज्ञान तज्ञ , सांख्यिकी तज्ञ, अर्थ तज्ञ, आधारसामग्री तज्ञ, यंग प्रोफेशनल, इतर सहाय्यक कर्मचारी) नियुक्त करता येतील. राज्य आधारसामग्री प्राधिकरणाच्या नियामक समितीच्या मंजुरीनंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र यांच्याद्वारे गठित करण्यात आलेल्या समितीद्वारे निवड केली जाईल.

## ५.३ पद भरती पद्धती

- सर्व पदे भरण्याचे धोरण/SOP ला राज्य आधारसामग्री प्राधिकरणाच्या नियामक समितीच्या मान्यतेनुसार बाहय नियुक्तीद्वारे अथवा प्रतिनियुक्तिद्वारे भरली जातील.

- सर्व पदांसाठी जाहिरात दिली जाईल व पारदर्शक व गुणवत्तेवर आधारित मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र यांच्याद्वारे गठित करण्यात आलेल्या समितीद्वारे निवड केली जाईल.
- सदर पदांसाठी निर्धारित वेतनश्रेणी किंवा एकत्रित मानधन लागू राहील.
- वेतनात पुढे बदल करावयाचा असल्यास राज्य आधारसामग्री प्राधिकरणाच्या नियामक समितीची मान्यता आवश्यक राहील.
- नियुक्तीचा कालावधी कमाल ३ वर्षांपर्यंत असेल (वार्षिक मूल्यांकनास अधीन राहून) तथापि, कामगिरीच्या पुनरावलोकनानंतर नूतनीकरणास पात्र.

**६. मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे व त्याची अंमलबजावणी**

- मुख्य आधारसामग्री अधिकारी यांच्या स्वाक्षरीने आणि मुख्य कार्यकारी अधिकारी,मित्र यांच्या मान्यतेने राज्य आधारसामग्री प्राधिकरण आधारसामग्री व्यवस्थापनासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे, परिपत्रके किंवा सूचना निर्गमित करतील.
- सर्व विभाग, मंडळे, महामंडळे व स्थानिक संस्था राज्य आधारसामग्री प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करतील.
- मार्गदर्शक तत्वानुसार राज्य आधारसामग्री प्राधिकरण सर्व संबंधित यंत्रणा / मंडळे / महामंडळे यांचे नियत कालिकरित्या आढावा घेतील. तसेच डेटा ऑडिट साठी विनंती करतील किंवा अनुपालन अहवाल मागवतील.
- डेटा सुरक्षा उल्लंघन किंवा गैरवापर आढळल्यास, राज्य आधारसामग्री प्राधिकरण हे राज्य आधारसामग्री सुकाणू समिती समोर करावयाच्या उपाय योजना किंवा धोरणात सुधारणा सादर करेल.

७. राज्य आधारसामग्री प्राधिकरणासाठी येणारा खर्च मागणी क्र. ओ-७, “३४५१- सचिवालयीन आर्थिक सेवा ०९२- इतर कार्यालये, (००) (०४) महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासास चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता सक्षमीकरण प्रकल्प (MahaSTRIDE) (फलश्रुती आधारित कार्यक्रम) (जागतिक बँक हिस्सा ७० टक्के) (३४५१ए२३३) (कार्यक्रम)” या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून करण्यात यावा. MahaSTRIDE प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर यावरील खर्च मागणी क्र. ओ-७, “३४५१- सचिवालयीन आर्थिक सेवा, ०९२- इतर कार्यालये, (००) (०१) महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र (३४५१ए१२६) (कार्यक्रम)” या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून करण्यात यावा.

८.    सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५१११०१७२६४९०११६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(विवेक गायकवाड)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (उपक्रम), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. सर्व मा. मंत्री महोदय यांचे खाजगी सचिव,
१२. सर्व मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१३. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय ,मंत्रालय, मुंबई,
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), मुंबई,
१७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,

१९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
२०. महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२१. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी, मुंबई.
२२. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर.
२३. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
२४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
२५. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६. निवडनस्ती, कार्यासन १४१७, नियोजन विभाग ,मंत्रालय, मुंबई.